# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

*महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ*


**डॉ. एस. एम. रोकडे**
संचालक (प्र.)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२२, २२३३२४ फॅक्स : ०७१३२.२२३३२२
**Email :** bcud.gondwanauniversity@ gmail.com
web:gondwana.digitaluniversity.ac
web:gondwanauniversity.org . www.unigug.org


क्र/गों.वि./बी.सी.यु.डी./ 97 / 2015 — दिनांक : 17 / 03 / 2015

**प्रति,**

मा. / अध्यक्ष / सचिव / प्राचार्य,
सर्व संलग्नीत शारिरीक शिक्षण महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :–** शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांच्या सेवानिवृत्तीनंतर सेवा पुढे चालु न ठेवण्याबाबत.

**संदर्भ :–** १. शासनाचे पत्र क्र. न्याप्र२०१५/प्र.क्र.५०/१५/विशि–१ दि. ९.२.२०१५.
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/(२८१/१४)/२०१४/नावि/विशि/१ दि. २७ फेब्रुवारी, २०१५.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांच्या सेवानिवृत्तीच्या नियत वयोमानात ६० वरून ६२ वर्षे वाढ करण्याबाबत शासनाचे कोणतेही आदेश किंवा निर्देश नाही.

संदर्भांकित पत्रानुसार मा. संचालक, उच्च शिक्षण यांनी शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांना सेवानिवृत्तीची वयोमर्यादा वाढविण्याबाबतच्या तरतूदी शासनाने लागू केलेल्या नसतांना यापुढे संबंधित अध्यापकांच्या संबंधित संस्थेने किंवा संबंधित विद्यापीठाने त्यांच्या नियत वयोमानानुसार (६०वर्षे) सेवानिवृत्तीनंतरही सेवा पुढे चालू ठेवली असेल, तर त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे वेतन देण्याची जबाबदारी ही संबंधित संस्थेची राहील असे कळविलेले आहे. तसेच शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांना सेवानिवृत्तीची वयोमर्यादा वाढविण्याबाबत शासनाने कोणतेही आदेश दिलेले नसतांना संबंधितांच्या सेवानिवृत्तीच्या वाढीबाबत निर्णय घेणे शासन निर्णयातील तरतूदीशी विसंगत असुन सदरच्या सूचना विद्यापीठाच्या अधिनस्थ असलेल्या सर्व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना तात्काळ निर्गमित करण्याबाबत आदेशित केलेले आहे.

करिता आपल्या महाविद्यालयातील अध्यापकांच्या सेवानिवृत्तीनंतर सेवा पुढे चालु ठेवु नये, याची नोंद घ्यावी.

कळावे.

**सहपत्र :–** मा. शिक्षण संचालक यांचे पत्र.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

गोंडवाना विद्यापीठ ...
महाविद्यालय व ...
आवक क्र. 3913 दिनांक 11/3/15
जावक क्र. ........ दिनांक ........

482
29

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

Web: www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in
फोन नंबर- ०२०/ २६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नंबर- ०२०/२६१११११५३,

क्रमांक- युएनआय/(२८१.१४)/२०१४/नावि/विशि-१/ दिनांक फेब्रुवारी, २०१५

27 FEB 2015

प्रति,

१.सदस्य सचिव तथा कुलसचिव
कामकाज आढावा समिती
सर्व अकृषि विद्यापीठे

२. सदस्य सचिव तथा परीक्षा नियंत्रक
कामकाज आढावा समिती.
सर्व अकृषि विद्यापीठे

1186 9/3/15

**विषय- मा उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर**
**याचिका क्रमांक ४७०९/२०१३**
**श्री संजय रामचंद्र मराठे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर**
**व**
**याचिका क्रमांक ४९८/२०१३**
**श्री उत्तमचंद अमीनचंद ठाकूर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर**

संदर्भ- शासनाचे क्रमांक न्यायाप्र२०१५/प्र.क्र.५०/१५/विशि-१
दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, श्री संजय रामचंद्र मराठे व श्री उत्तमचंद अमीनचंद ठाकूर हे दोन्ही अध्यापक शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापक असून त्यांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

तथापि श्री संजय रामचंद्र मराठे यांनी मा उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याचिका क्रमांक ४७०९/२०१३ दाखल केलेली होती. तसेच श्री उत्तमचंद ठाकूर यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याचिका क्रमांक ४९८/२०१३ दाखल केलेली होती.

या याचिकेच्या अनुषंगाने शासनाने असे आदेश दिलेले आहेत की, शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांना सेवानिवृत्तीची वयोमर्यादा वाढविण्याबाबतच्या तरतूदी शासनाने लागू

केलेल्या नसतांना यापुढे संबंधित अध्यापकांच्या संबंधित संस्थेने किंवा संबंधित विद्यापीठाने त्यांच्या नियत वयोमानानुसार(६० वर्षे) सेवानिवृत्तीनंतरही सेवा पुढे चालू ठेवली असेल, तर त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे वेतन देण्याची जबाबदारी ही संबंधित संस्थेची राहील. शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील अध्यापकांना सेवानिवृत्तीची वयोमर्यादा वाढविण्याबाबत शासनाने कोणतेही आदेश दिलेले नसतांना संबंधितांच्या सेवानिवृत्तीच्या वाढीबाबत निर्णय घेणे शासन निर्णयातील तरतूदीशी विसंगत आहे.

तरी सदरच्या सूचना आपण आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्थ असलेल्या सर्व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रत-

१. मा श्री विकास तु कदम, कक्ष अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.
२. सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

२/- त्यांना कळविण्यात येते की, विषयांतर्गत प्रकरणी आपण आपल्या विभागातील सर्व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना सदरची बाब निदर्शनास आणावी.